**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**मंगळवार दिनांक ७ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्तांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपये अर्थसहाय्य जाहीर/ खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख नुकसान भरपाई.**

2. **पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून महाराष्ट्राच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर**

3. **भुसावळ - वर्धा तिसरी आणि चौथी लाईन तसंच गोंदिया - डोंगरगड चौथी लाईन या रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी**

4. **अमरावती महापालिकेला ई-बस डेपो आणि चार्जींग व्यवस्थेकरिता जमीन उपलब्ध करून देण्याचा राज्य मंत्री मंडळाचा निर्णय**

**आता सविस्तर बातम्या .......**

**अतिवृष्टी पॅकेज**

राज्यात पुराचा फटका बसलेल्यांना राज्य सरकारकडून ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. यापैकी जास्तीत जास्त नुकसानभरपाई दिवाळीच्या आधी देण्याचा प्रयत्न करू, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

***आमचा शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा राहिला पाहिजे या दृष्टीने आम्ही जास्तीत जास्त रिसोर्सेस याच्याकडे वळवण्याचा निर्णय घेतला आणि त्या दृष्टीने आम्ही कॅम्पन्सेशनच्या संदर्भातले पॅकेज तयार केलेला आहे***

मुंबईत आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासोबत वार्ताहर परिषदेला संबोधित केलं. राज्यातल्या एकंदर ६८ लाख ६९ हजार ७५३ हेक्टरवरच्या पिकाचं नुकसान झालं असून २९ जिल्ह्यांमधल्या २५३ तालुक्यांत २ हजार ५९ मंडळांतल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणार असल्याचं ते म्हणाले. विहिरी, पायाभूत सुविधा पुन्हा उभारण्यासाठी, तसंच घरं, गोठे, दुकानं, जनावरांचं नुकसान झालेल्यांनाही अर्थसहाय्य देणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

***तर जो कोरडवाहूचा आमचा शेतकरी आहे. यांना हेक्टरी १८ हजार ५०० रुपये मिळतील जो आमचा हंगामी बागायतदार शेतकरी आहे त्याला २७ हजार रुपये हेक्टरी मिळतील आणि जो आमचा बागायती शेतकरी आहे त्याला ३२ हजार ५०० रुपये हेक्टरी देण्याचा निर्णय केला आहे याच्या व्यतिरिक्त जवळपास ४५ लाख आपले शेतकरी जे आहेत यांचा विमा आपण उतरवलेला आहे.***

खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख नुकसानभरपाई, तर ३ लाख रुपये प्रति हेक्टर इतकी भरपाई मनरेगाच्या माध्यमातून देऊ, अशी माहितीही त्यांनी दिली. दुष्काळाच्या तरतुदी इथंही लागू करून त्यानुसार कार्यवाही करू, असा पुनरुच्चार फडणवीस यांनी केला. दरम्यान शेतकऱ्याचं उभ पिक उध्वस्त झालं असताना सरकारने दिलेली मदत अगदीच तुटपुंजी असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वाडेट्टीवार यांनी केली आहे.

**मोदी महाराष्ट्र दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून महाराष्ट्राच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर येणार आहेत. सुमारे १९ हजार ६५० कोटी रुपये खर्चून बांधलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. हे विमानतळ देशातील सर्वात मोठा ग्रीनफील्ड विमानतळ प्रकल्प आहे. मुंबई मेट्रो लाईन-३ च्या फेज २ बीचं उद्घाटन, त्याचबरोबर ११ सार्वजनिक वाहतूक ऑपरेटरसाठी मुंबई वन-इंडियाच्या पहिल्या एकात्मिक कॉमन मोबिलिटी ॲपचं अनावरण देखील पंतप्रधान करणार आहेत. महाराष्ट्रातल्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष विभागाच्या अल्पकालीन रोजगारक्षमता कार्यक्रमाचं उद्घाटन देखील मोदी यांच्या हस्ते होईल.

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीनं २४ हजार ६३४ कोटी रुपयांच्या चार रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांमध्ये भुसावळ - वर्धा तिसरी आणि चौथी लाईन, गोंदिया - डोंगरगड चौथी लाईन, वडोदरा - रतलाम तिसरी आणि चौथी लाईन आणि इटारसी - भोपाळ - बीना चौथी लाईन यांचा समावेश आहे. चार मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांमध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि छत्तीसगडमधील १८ जिल्हे समाविष्ट असतील, ज्यामुळे भारतीय रेल्वेचे विद्यमान जाळे सुमारे ८९४ किलोमीटरने वाढणार आहे.

***ये जो प्रोजेक्ट्स आज आए हैं दिल्ली मुंबई वाले में, रतलाम से बड़ौदा, मुंबई, हावड़ा में भुसावल से वर्धा, दिल्ली चेन्नई में बीना से इटारसी और मुंबई, कोलकाता में गोंदिया से डोंगरगढ़ ये चार ऐसे सेक्शंस हैं, जिन सेक्शन के लिए क्वाड्रप्लिंग का आज इसमें अप्रूवल हुआ है।***

भुसावळ - वर्धा हा रेल्वे मार्ग अंदाजे ९ हजार १९७ कोटी रुपयांच्या खर्चाने बांधला जाईल. ९८ किलोमीटर लांबीचा गोंदिया - डोंगरगड चौथा मार्ग पाच वर्षांत पूर्ण होईल आणि त्याचा अंदाजे खर्च

दोन हजार २२३ कोटी रुपये असेल.  कोळसा, कंटेनर, सिमेंट, फ्लाय ॲश, अन्नधान्य आणि स्टील यांसारख्या वस्तूंच्या वाहतुकीसाठी देखील हे मार्ग महत्वपूर्ण आहेत असं वैष्णव म्हणाले.

**फिनटेक**

तंत्रज्ञानाचा वापर हत्यार म्हणून नव्हे, तर जनतेच्या कल्याणासाठी व्हावा असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज मुंबईत सहाव्या ग्लोबल फिनटेक फेस्टचं उद्घाटन करताना बोलत होत्या. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कार्यक्षमतेत वाढ होते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो असं सांगतानाच त्यांनी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीचं उदाहरण दिलं. लाभार्थ्यांना हवं तिथे पैसा वापरण्याची संधी मिळाल्यामुळे बचत ठेवींमधे ४ लाख ३१ हजार कोटी रुपयांची भर पडली आहे असं त्या म्हणाल्या. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान  केयर स्टार्मर येत्या गुरुवारी या महोत्सवात सहभागी होणार आहेत. उद्योग क्षेत्रातले तज्ञ, धोरणकर्ते आणि नवोन्मेषकांशी ते यावेळी संवाद साधतील.

**ओबीसी प्रमाणपत्र**

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा नोंदी असलेल्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या शासन निर्णयाला स्थगिती देण्यास  मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर राज्याच्या सामाजिक न्याय विभागानं उत्तर द्यावं, असे आदेश मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठानं दिले. गेल्या २ सप्टेंबर रोजी हा शासन निर्णय जारी झाला होता.

**राज्य मंत्री मंडळ निर्णय**

अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजने अंतर्गत ई-बस डेपो आणि चार्जींग व्यवस्थेकरिता मौजा बडनेरा इथली २ हेक्टर ३८ आर जमीन ३० वर्षांसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्री मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. अन्य महत्वपूर्ण निर्णयांमध्ये महाराष्ट्र राज्याचं रत्ने आणि  दागिने धोरण - २०२५ जाहीर करण्यात आलं आहे. या अंतर्गत एक लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितिचं  उद्दीष्ट ठेवण्यात आलं आहे. याशिवाय महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत आणि त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. खाजगी सूतगिरण्यांना एकात्मिक आणि  शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत  सहकारी सूतगिरण्यांप्रमाणे दर युनीटसाठी  ३ रुपये वीज अनुदान सवलत लागू करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

**एसटी महामंडळ**

एसटी महामंडळ कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सांगितलं. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून कामगारांच्या महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, दिवाळी अग्रिम यांसह अन्य थकीत भत्त्यांबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं . एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी जाहिराती, आधुनिक पार्सल सेवा आणि पेट्रोल पंप व्यावसायिक वापरासाठी खुले करण्याद्वारे वर्षाला अंदाजे ६०० कोटी रुपयांच उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं ते म्हणाले.एसटीची स्वतःचे प्रवासी ॲप, ॲप-आधारित टॅक्सी आणि ई-बाईक सेवा सुरू करण्याची तयारी सुरू आहे. पीपीपी तत्त्वावर एसटीच्या जागांचा विकास करून कामगारांना सदनिका आणि विश्रामगृह उपलब्ध करून देण्याचंही आश्वासन सरनाईक यांनी दिलं

**जीएसटी**

वस्तू आणि सेवा परिषदेनं जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. नव्या कररचनेमुळे अनेक वस्तू, पदार्थ स्वस्त झाल्यान ग्राहकांना याचा फायदा होणार आहेच, शिवाय राज्यांच्या अर्थव्यवस्थेलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. गृहिणी अर्चना पाटील यांनी या बाबत आपलं मनोगत व्यक्त केलं

***पूर्वी आम्ही महिला वर्ग बाजारामध्ये जाताना कोणत्या वस्तू खरेदी करीत होतो तर दुकानदारांना आम्ही विचारतो हे वस्तू एवढी महा कशी काय तर ते आम्हाला सांगत होते. मॅडम जीएसटी वरील दर खूप वाढलेले आहे. त्यामुळे प्रत्येक वस्तू महाग पडणारचं परंतु आता नरेंद्रजी मोदी यांनी जो निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे प्रत्येक वस्तू आणि ज्या जीवनोपयोगी कपडे म्हणा किंवा किराणा वस्तू म्हणा यावरील दर कमी झालेला असल्यामुळे आम्हा महिला वर्गांना खूप आनंद झालेला आहे आणि त्याचा सर्वसामान्य महिलांना खूप म्हणजे खूप उपयोग होईल.***

**निषेध आंदोलन**

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आज भंडाऱ्यातील त्रिमूर्ती चौक इथं ओबीसी क्रांती मोर्चाच्या वतीन आंदोलन करण्यात आलं बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद बार असोसिएशनन देखील हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. आज स्थानिक वकिलांनी काळ्या फिती लावून सभा घेतली.सभेनंतर राष्ट्रपती आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांना निवेदन सादर करण्यात आल.

**हवामान**

आज नागपूरसह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळाची शक्यता असल्यामुळं सतर्कतेचा यलो अलर्ट नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं जारी केला आहे.

उर्वरित जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य राहणार आहे. दरम्यान येत्या काही तासात गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांतील काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**महर्षि वाल्मिकी जयंती**

रामायण या महाकाव्याचे रचयेता आणि संस्कृत भाषेचे अभ्यासक महर्षि वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही समाजमाध्यमाद्वारे वाल्मिकी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्राचीन काळापासून महर्षि वाल्मिकी यांच्या सात्विक आणि आदर्श विचारांचा सखोल प्रभाव आहे, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

*****